# प्रभुतरुण

| वर्ष ८९ | अंक ८ | मुंबई | मार्च २०१३ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना* : तारीख २५ ऑगस्ट १९२३)


**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**


**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ* : **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**


*संपादकीय*

## रम्य भाविकाल?!...

**—सुहासिनी कीर्तिकर**

परवाच्या वर्तमानपत्रात आमचे स्नेही सुहास पळशीकरांचे सदर होते. राजकीय आखाड्यात होणारं राजेशाहीचं राजकारण हा त्यांचा विषय होता. दर दहा वर्षांनी भारताच्या निवडणूककेंद्रांचा, होणाऱ्या बदलांचा अभ्यास करून, सर्वेक्षण करून त्याचा आढावा होता. फार पूर्वी आधी राष्ट्रधर्म, मग पक्षधर्म, नंतर घराणेशाही अशी उतरंड असायची. हळुहळू व्यक्तीगत स्वार्थ आणि राजकारण यांचं इतकं अद्वैत जुळलं की आपल्याच कुळातल्या 'दिवट्यां'ना सत्ता कशी देता येईल याकडं लक्ष पुरवलं जाऊ लागलं. आता हे 'लक्ष्य'ही बनलं. त्यामुळं स्वत:चा मुलगा वा मुलगी यांचं भलं करता करता 'पुतणे'ही त्याचा परीघ वाढवू लागले. 'आपुल्यामध्ये विश्व पाहुनि पूजितसे विश्वाला' ही वृत्ती वाढली. 'वाढता वाढता' वाढणाऱ्या या वृत्तीनं 'राष्ट्र'धारणाही फक्त घोषणांपुरती उरली. अनितीचं 'प्रदूषण' तर इतकं वाढलं की प्रसंगी देश बुडीत खात्यात जमा झाला तरी 'या' मंडळींचं 'जमाखाते' महत्त्वाचं ठरलं. जे मोठमोठ्या पातळीवर राजकारण; तेच छोटछोट्या पातळीवरही बोकाळलं.

म्हणजे अगदी वरपासून खालपर्यंत; म्हणजे देशापासून छोट्या सीमित संस्थांपर्यंत भक्कम चौकट लोकशाहीची, आदर्शाची. मात्र या चौकटीत चपखल बसूनच राजेशाही, घराणेशाही चालवायची अशी थेट प्रथाच तयार झाली की. स्वार्थ या चौकटींना खिळखिळा करू लागला. कारकीर्दीची सत्ता, सत्तास्थानामुळं येणारा सन्मान- कीर्ति- धनलाभ, नवनवीन पायंडे पाडून नवनवीन कुरणे चरायला मोकळी करणं असा स्वार्थी मामला छोटछोट्या संस्थांमध्येही प्रमुख भूमिका बजावू लागला. परत वर तर्कट लढवायला वा लादायला आपण मोकळे: 'अरे जे देशात घडतेय् ते थांबवायची अक्कल नाही. संस्थांमध्ये कशाला लुडबुडताय् अन् तत्त्वाचे तारे तोडताहात?' -असं म्हणून छोटंछोटं राजकारण यांचं चालूच. सध्या कुठंही नजर टाका. कोणतीही बातमी पहा, वाचा. त्यात हेच चित्र दिसतेय.

नुकतीच पार पडलेली (की 'पाडलेली'?) नाट्यपरिषदेची निवडणूक आठवली नं या संदर्भात? बातम्यांचे सारे संदर्भ तपासून पाहिले तर असं काहीबाही आठवणं अगदी सहज आहे. नाट्यपरिषद ही संस्था काय करते? तर अखिल भारतीय नाट्य संमेलन दरवर्षी भरवते. आणखी काय करते? तर नाट्यनिर्माता संघाला वळण लावते. आणखी? हं! बालनाट्य प्रयोगांना छोटीशी तिची अशी जागा देऊन प्रोत्साहन देते. प्रायोगिक रंगभूमीला (थोडेसेच) खतपाणी घालते. फारफार तर ज्येष्ठ श्रेष्ठ रंगकर्मींचा सन्मान करते. महाराष्ट्रभर अनेक शाखांनी पसरलेल्या या संस्थेचे जागतिक पातळीवरही नाट्यसंमेलन सुरू झालेले आहे. आणखी? आणखी असंच काही किडुकमिडुक काम ती करते. पण ही परिषद हाती रहावी म्हणून किती हात बांधलेले? कारण एकच. सत्ता, सांस्कृतिक क्षेत्रातील, सरकार दरबारची जागती वर्दळ, त्यामुळं मिळणारे लाभ; मानमरातब. नियंत्रणाचा दर्प. नाहीतरी अनेक रंगकर्मी रंगभूमीवर प्रकाशझोतात असतात. या प्रकाशात रहावयाच्या सवयीचे ते गुलाम असतात किंवा होतात कीं काय? खरंतर नाट्य परंपरेत मराठी नाट्यसृष्टी पूर्वीपासून फार आघाडीवर आहे. पण निवडणुकांच्या संदर्भातही 'नाटके' करण्यातही तिनं आघाडीवर रहावं? मग मतपत्रिका बनावट करणं काय; किती 'संघर्ष'मय नाटक? किती उत्कंठावर्धक नाटक? किती किती या 'नाटका'चे प्रयोग? संस्कृती घडविणारी नाट्यपरंपरा धुळीला मिळविणारी ही अशी 'नाटके'? पडद्यामागची, पडद्यावरची, पडदा पाडणारी, पडदा उघडणारी... सर्व

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## जरा विसावू या वळणावर

**-संजना दीपक कोठारे**

'तसे आपण सगळेच निरागस असतो जन्मानंतर थोडाच वेळ. मग सुरू होतो आपल्याशी या बनेल आयुष्याचा खेळ.' कवी चंद्रशेखर गोखलेंचे हे शब्द मला सतत माझ्या लहानपणाची आठवण करून देतात. आईवडिलांच्या छायेखाली आपण वाढलेलो असतो. इतकं प्रेम आणि विश्वास ठेवतो आपण त्यांच्यावर की त्यांनी शिकवलेली प्रत्येक गोष्ट आपल्याला जणु देवआज्ञाच. प्रत्येक मुलाला आपल्या आईवडिलांवर विश्वास असतोच परंतु त्या निरागस वयात त्या बाळाला चांगल्या वाईटाची जाण नसते. आईवडील जे काही बोलतात किंवा शिकवतात ती त्यांच्यासाठी काळ्या दगडावरची रेघ असते.

आईवडिलांची शिकवण आणि आयुष्याकडे पाहण्याची एक सकारात्मक प्रवृत्ती लहानपणीच माझ्या अंगवळणी पडली. जग किती सुंदर आहे आमि सुरक्षित आहे यावर विश्रास बसत गेला कारण अशाच सुरक्षित आणि प्रेमळ वातावरणात मी वाढलेले. बालपण सरले आणि यौवनात निरनिराळे अनुभव येत गेले. तेव्हा जाणीव झाली की जग तेवढे सुरक्षित नाही, जेवढे आपण लहानपणी समजायचो. आपले सुरक्षाकवच केवळ आपल्या कुटुंब आणि नातेवाईकां-पुरतीच मर्यादित आहे हे समजून सावध झाले. 'अनोळखी माणसाशी बोलू नये.' आईची ही शिकवण लक्षात होती. परंतु स्वतंत्र मार्गावर जेव्हा जीवनाची वाटचाल सुरू झाली तेव्हा कळून चुकले की ते मर्यादित जगसुद्धा सुरक्षित नाहीच. त्या क्षणाला ती निरागसता पूर्णपणे मिटून गेली आणि या बनेल आयुष्याचा खेळ लक्षात आला.

हल्ली लैगिक छळवणुकीबद्दल आपण असंख्य अशा गोष्टी ऐकतो. हे प्रकार केवळ अशिक्षित किंवा खालच्या वर्गाच्या लोकांमध्ये घडतात असे नाही परंतु सुशिक्षित, उच्च घराण्यातसुद्धा हे प्रकार घडत असतात ही गोष्ट बरेचजण स्वीकारणार नाहीत. परंतु हे सत्य नाकारूनही चालणार नाही. फरक केवळ एवढाच की त्यांनी केलेला लैगिक छळ उघडकीस येतो आणि सुशिक्षित लोकांवर परिवार आणि नातेवाईकांच्या प्रेमाचे पांघरूण ओढले जाते. लैगिक छळवणूक ही काही नवीन गोष्ट नाही हे आपल्या सर्वांना माहीतच आहे आणि ती गैर आहे हेसुद्धा सर्वांना माहीत आहे. आपण हे जाणूनसुद्धा आपल्यापैकी एकाने तरी छळवणूक बंद करण्यासाठी काही प्रयत्न केले आहेत का?

आपल्या ऐकिवात अशा बऱ्याच घटना घडतात परंतु त्या ऐकून न ऐकल्यासारख्या करून पुरल्या जातात. याचे कारण काय? जेव्हा स्वत:च्या घरात ही घटना घडेल त्यानंतर या गुन्ह्यावर आक्षेप घेतला जाईल का? हा विचार कधी कोणी केला आहे की आज कोणा दुसऱ्या स्त्रीवर हा अत्याचार घडला, उद्या ती स्त्री तुमच्या घरातली असू शकते आणि लैगिक छळवाद करणारा अनोळखी मनुष्य नसून तुमच्या परिचयाचाच असू शकतो. तेव्हाही त्या अत्याचारी व्यक्तीला सुशिक्षित आणि उच्च घराण्यातला समजून क्षमा केली जाईल का? केवळ लैगिक छळवाद आहे आणि त्यातून काही अपाय झाला नाही म्हणून तो गंभीर गुन्हा नाही असं वाटतं का? शारीरिक अपाय झाला नसला तरी त्या व्यक्तीला झालेला मानसिक छळवाद याची गंभीरता कोणी लक्षात घेत नाही. हे पाहून खंत वाटते की,प्रत्येकजण केवळ आपला स्वार्थ पाहून आपली प्रतिक्रिया देत असतो आणि या अन्यायाला जाणीवपूर्वक साथ देत असतो.

आईवडिलांची शिकवण कधीही खोटी ठरली की धोका केवळ अनोळखी माणसांकडूनच असतो आणि आपण केवळ त्यांच्याबरोबर असुरक्षित असतो. आयुष्यात अशा बऱ्याच घटना पाहिल्या, ऐकल्या आणि वाचल्या ज्यामुळे हा विश्वास बसत गेला की 'विश्वास' हा शब्दच मुळात दुर्मिळ होत चाललाय. कोणावर विश्वास ठेवावा आणि कोणावर नाही हा शेवटी जुगारच

(पान २ कॉलम २ वर)

(पान १ कॉलम २ वरून)
प्रकारची. आता हा लेख प्रकाशित होईपर्यंत निवडणुकांचे निकाल लागलेच आहेत. अध्यक्षपदाचाही 'निक्काल' लागेल. 'सस्पेन्स' नाट्य संपेल. 'लोकशाही' पद्धतीनं होणाऱ्या अशा निवडणुकांमधील हे राजकारण पाहिलं की अति झालं अन् हसू आलं असंच म्हणून सोडून द्यावं की झालं!

कारण सगळीकडेच हे चाललं आहे ना? परवा 'सकाळ'मध्ये महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या गोंधळाचं तेच चित्र होतं. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ आता या १ एप्रिलपासून मुंबई मराठी साहित्य संघाकडून महाराष्ट्र साहित्य परिषदेकडे तीन वर्षांकरिता जाणार आहे. या मंडळावर संस्थेतर्फे तीन पदाधिकारी जातात. हे कोण असावेत याविषयीची निर्णयनसभा मसापची चांगली चार तास चालली. कार्याध्यक्ष, कार्यवाह आणि कोषाध्यक्ष त्या त्या संस्थेने निवडलेले असतात. तेच महामंडळावर जायला हवेत. पण लोकशाहीच्या चौकटीत राहून त्यासाठी चार चार तास बैठक! मुंबई मराठी साहित्य संघाने महामंडळासाठी तीन पदाधिकारी दिले तेव्हा उषा तांबे कार्यकारिणीत कुठल्याही पदावर नव्हत्या. पण त्या संस्थेने सामंजस्य राखून दिलेल्या निर्णयाने त्या महामंडळ अध्यक्ष झाल्या. एक साधा कार्यकारिणी सभासद अध्यक्ष झाला; तेच मेहेंदळे आणि दळवी यांच्या बाबतीत होऊन ते अनुक्रमे कार्यवाह अन् कोषाध्यक्ष झाले. पण 'मसाप'मध्ये मात्र या तीन पदांसाठी लोकशाहीच्या चौकटीत राहून निवड. बरं निवड झाली. पण आता सत्ता अन् स्वार्थासाठी या तीन जणांमध्ये अध्यक्षपदासाठी चुरस. आता आपला अध्यक्ष या तीन नावांमधून मतदानपद्धतीने म्हणजेच लोकशाही पद्धतीने महामंडळाने ठरवायचा. अर्थात, हे ठरविण्याचा अंतिम अधिकार महामंडळाचाच असतो. संस्थेने दिलेले अधिकारी महामंडळाला मान्य नसले तर ते बदलण्याचा वा त्या त्या संस्थेकडे तक्रार करून बदलविण्याचा अधिकार महामंडळाचाच असतो. असं पूर्वी घडलं आहे. गंगाधर गाडगीळ अध्यक्ष होते. त्यांचा कारभार महामंडळाला मान्य न झाल्यामुळं शेवटी त्याजागी श्री. पु. भागवत आले. सुरेश द्वादशीवार महामंडळाला मान्य न झाल्यामुळं त्याजागी संबंधीत संस्थेने मनोहर म्हैसाळकर दिले. संस्थेने दिलेल्या पदाधिकाऱ्यांना महामंडळ नाकारू शकते. पण आता चित्र असं उभं राहिले की महामंडळ मतदान घेऊन अध्यक्ष ठरवणार. हे अर्थात् क्वचितच घडतं. आता हा लेख प्रकाशित होईपर्यंत ९ मार्चच्या बैठकीत हे मतदान होईल अन् माधवी वैद्य की मिलिंद जोशी अध्यक्ष हे ठरेलच. त्यात सुनील महाजनही लढतीत आहेत. (हा लेख लिहिल्यानंतर बातमी आली की मिलिंद जोशीनं स्पर्धेतून माघार घेतली. चऽऽला. एक संघर्षनाट्य टळलं!) पण मनात प्रश्न उभा रहातो की हे सत्तेचे राजकारण कशासाठी? लोकशाहीच्या चौकटीत राहून वैचारिक लढाई लढणं वेगळं अन् लोकशाहीच्या नावाखाली स्वार्थांध राजेशाही जोपासणं तद्दन वेगळंच. पण अलीकडे सांस्कृतिक क्षेत्रातही हे लोण मोठ्या प्रमाणात पोहोचलं आहे. विश्व मराठी कोश असो; राज्य विकास संस्था असो वा इतर साहित्य संस्था असोत; सांस्कृतिक महाराष्ट्राच्या वर्तनरेषा असांस्कृतिकरित्या ठळक होत जाताहेत. त्या वाचल्या की या संस्थांचं भविष्य सांगायला कुणी जाणकार समीक्षक आवश्यक नाही. ज्या तऱ्हेने एक गट विदर्भ साहित्य संघ बळकावतो आहे, मराठवाडा साहित्य परिषद ज्या तऱ्हेने डॉ. सुधीर रसाळांना बाजूला करून विशिष्ट 'धंदेवाईक' यशस्वी साहित्यिकांना वाट करून देत आहे... हे पाहिलं की पोरासोरासारखा सामान्य रसिकही सांगेल की यांचं भविष्य! मग भविष्यात पूर्वी किती चांगली माणसं या संस्थांत होती, या संस्था किती भक्कम सांस्कृतिक आधार होत्या; याचा इतिहास उजळण्यातच धन्यता मानावी लागेल. पण असं घडू नये.

'पूर्व दिव्य ज्याचे त्यांना
रम्य भाविकाल'

असं म्हणता यायला हवं आहे. आपण वेळीच जागं होऊन त्यासाठी झटूयात. हो! 'रम्य भाविकाल' ज्यांचा आहे अशा दहावी, बारावी आणि तत्सम परीक्षांना सामोरे जाणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा.

शिक्षण मंडळाच्या चौकटीत राहून कोणतेही 'अराजककारण' न करता केवळ बुद्धी, ज्ञानलालसा, परिश्रम, वेळेचं अवधान अन् घरच्यांचा पाठिंबा, सर्वांच्या शुभेच्छांचा पाठराखण करणारा सहवास अन् परीक्षेचा बाऊ न करता समतोल असलेला आत्मविश्वास या सर्वांमुळं आत्मविकासाची एकेक चढती पायरी चढणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना 'प्रभुतरुणा'चेही हार्दिक आशीर्वाद.

*

(पान १ कॉलम ४ वरून)
आहे. हल्ली टी.व्ही.वर किंवा वृत्तपत्रात अतिशय धक्कादायक बातम्या पाहायला आणि वाचायला मिळतात. बलात्कार आणि लैंगिक छळवणूक ह्या बातम्यांशिवाय हल्लीच्या बातम्या पूर्ण होतच नाहीत. बातमी प्रसिद्ध झाली की काही दिवस त्या बातमीची चर्चा होते. एक विषय मिळतो लोकांना गप्पा मारायला की, 'अरेरे, असं कसं झालं?' 'बिच्चारी!' किंवा काहीजण केवळ उत्सुक असतात हे जाणून घ्यायला की, 'काय केलं?', 'कसं केलं?', 'काय नेमकं झालं?' बस! ह्या वाक्याच्या पुढे जाण्याची न त्यांच्यात हिम्मत असते न क्षमता.

'फेसबुक'वर बऱ्याच जणांनी काही बलात्काराच्या बातम्या आणि त्या गुन्ह्याला बळी पडलेल्या स्त्रीबद्दल सहानुभूती प्रकट केली. परंतु त्यापुढे काय? 'रात गयी बात गयी', नाही का? चार दिवस चर्चा झाली. 'फेसबुक'वर आपले मत व्यक्त केले. दुसऱ्यांच्या वाक्यांना 'लाइक' केले. काही त्या विषयावर वाद विवाद करण्यासाठी सज्ज झाले आमि पाचव्या दिवशी वेगळ्या विषयावर चर्चा करायला मोकळे. ह्या गंभीर विषयाला हाताळण्याची किंवा त्याला तोंड फोडण्याची एकामध्येही क्षमता नाही, परतु 'ग्यान' देणारे बरेच दिसले. 'बलात्कारा'सारख्या गुन्ह्याला जन्मठेप द्यावी अशी शिफारस काही जणांनी केली जेव्हा हे पाप उघडकीस आले. परंतु 'लैंगिक छळवणूक' इतकी सामान्य गोष्ट झाली आहे की या घटनेकडे दुर्लक्ष केले जाते. 'असं घडतंच' 'कोणत्याही क्षेत्रात ह्या घटना सामान्य आहेत.' असे म्हणणारेसुद्धा आहेत. म्हणजेच आपण ह्या गोष्टी आपल्या सर्वसामान्य जीवनाचा भाग समजून स्वीकारायच्या का? हा अत्याचार तुमच्या घरात कोणावर घडला तरी तुमचे हेच मत राहील का? या अत्याचाराला कसलाच उपाय नाही का? असे बरेच प्रश्न माझ्या मनात येतात आणि दुर्दैवाने उत्तरसुद्धा माहिती असते की, या अपराधाला आणि अपराध करणाऱ्याला भारतात शिक्षा मिळणे अशक्य आहे कारण या अपराधाला शिक्षा मिळालीच तर आपल्या देशाची लोकसंख्या निम्मी होण्याची शक्यता आहे.

या सगळ्या अनुभवातून एक विचार मनात आला आणि तो म्हणजे आपल्या मुलांना 'विश्वास' या शब्दावर 'विश्वास' ठेवायला शिकवायचे की नाही? कवी चंद्रशेखर गोखले म्हणतात, 'असे बेसावध क्षणच सावधपणे टाळायचे असतात. जवळ येतानाच दुराव्याचे काही नियम पाळायचे असतात, परंतु मग विश्वास ठेवायचा तरी कुणावर आणि नाही ठेवायचा तो कुणावर? विश्वास या शब्दाची व्याख्याच दुर्दैवाने बदलत चालली आहे कारण हा अनुभवच आता मुळात दुर्मीळ होत चाललाय. मुलींना तर ही शिकवण दिली की कोणत्याही पुरुषावर विश्वास ठेवू नये तर त्या मुलीचा प्रेमावरचा विश्वासही मिटून जाईल. कोणाच्या मनात प्रेम आहे आणि कोणाच्या केवळ वासना या दोघांमधला फरक जाणून घेणे कठीणच आहे. यामुळे प्रत्येकाची वैयक्तिक नातीसुद्धा अतिशय कमकुवत होत चालली आहेत.

या निरागस मुलांना या अश्लील जगात पाठविताना मन हुरहुरतं. विश्वास एकदा तुटला की तो पुन्हा मिळवणं अशक्य आहे. विश्वास एका आरशासारखा आहे, जो कधी तुटला तर पुन्हा अखंड होऊ शकत नाही. महत्प्रयासाने जरी तो आरसा जोडला गेला तरी त्यावर तुटलेल्याची निशाणी म्हणून एक बारीक रेष तरी आढळून येतेच. उच्चारलेला शब्दसुद्धा मागे घेऊ शकत नाही, जसा कमानीतला तीर सुटल्यावर मागे घेता येत नाही. माझे प्रामाणिक मत आहे की विश्वास हा शंभर टक्के असतो किंवा शून्य. जर तो विश्वास तुटला तर कितीही जोडला किंवा पुन्हा मिळविण्याचा प्रयत्न केला तरी तो अखंड होऊ शकत नाही. त्यामुळे मी माझ्या मुलांना एवढेच सांगते की, 'असे कधीही वागू नये ज्यामुळे आपल्यावरचा विश्वास शून्य होईल.' जर विश्वास अखंड राहील तरच तुमची नाती अखंड राहतील नाहीतर पुढच्या पिढीला विश्वास आणि नीती काय असतात हे समजावणे कठीण जाईल.

जशी प्रत्येक गुन्ह्याला शिक्षा हवीच तसेच लैंगिक छळवाद करणाऱ्यांनासुद्धा तेवढीच कडक शिक्षा मिळायला हवी. अशा गुन्हेगारांना आश्रय देणारे त्याहून मोठे गुन्हेगार असतात आणि हे गुन्हे तेव्हाच बंद होतील जेव्हा गुन्हेगाराला आश्रय न देता त्याचा गुन्हा सर्वांसमोर उघड केला जाईल. गुन्हेगाराला साथ देणारी व्यक्ती गुन्हा लपविण्याचे पाप करून त्या गुन्हेगाराची शिक्षा वाचवतात आणि हा विषय केवळ एक चर्चेचा विषय बनून अस्तित्वात राहतो. परंतु त्या घटनेचा परिणाम त्या बळीवर अपायकारक ठरतो. या लैंगिक छळवादावर तोडगा काय? आपली मुलं जेव्हा या जगात पाऊल टाकतील त्यावेळी त्यांना सावध करण्यापलिकडे अजून बऱ्याच गोष्टी आहेत ज्यामुळे ते माणसाची ओळख पटवू शकतील आणि देवाच्या कृपेने काही खरी नाती जपू शकतील. त्यांना सावध करण्याची जबाबदारी आपलीच आहे.

शेवटी मनष्य एकटा येतो आमि एकटा जातो. माणसाची खरी ओळख त्याला त्याच्या खाजगी अनुभवातूनच येते. कधी असतो आपण घोळक्यात तर कधी त्या घोळक्यातसुद्धा एकटेच असतो. कारण मनात एक भीती असते की, 'विश्वास ठेवायचा तो कुणावर?' हा विचार माझ्या मनात कायम येत असतो. तुमच्याही आला का? पुढच्या पिढीला आपली आणि आपल्या अनुभवाची गरज आहे. त्यांना योग्य मार्ग समजावा, त्यांनी योग्य निर्णय घ्यावा आणि त्यांना सत्याला साथ देण्याची ताकद मिळावी याची खबरदारी आपणच घेऊ शकतो. तर इथून पुढे जाताना जरा विसावू या वळणावर, की आपल्या पुढच्या पिढीला कसे सावध करायचे आणि या अत्याचाराला सामोरे जाण्यासाठी कसे सशक्त बनवायचे. आयुष्याच्या खेळात जो विश्वास दुर्मीळ होत चाललाय त्यावर चार ओळी मनात आल्या त्या जाता जाता आपल्या समोर सादर करते.

'यू तो साथ होते है सब, पर फिरभी कोई साथ नही, यू तो करते है अपना होने का दावा, पर ये सायाभी तो अपना नही।'

लेखांक-३

## फुलता नलिनी दल

# नादब्रह्म

— नलिनी तळपदे

काय म्हणता? आय हॅव नो व्हॉईस? अहो असं म्हणून कसं चालेल? प्रत्येकाला आवाज असतोच. माणूस जन्माला येतो तोच मुळी या आवाजाच्या दुनियेत आपला आवाज हरवून जाणार नाही याची काळजी घेत. त्याच्या रडण्याने त्याच्या अस्तित्वाची नोंद केली जाते. वेळप्रसंगी आवाज उठवायला हवा. व उठवता उठवता बसणार नाही याची काळजीही घ्यायला हवी.

आपली बाजू मांडताना, अगदी मतं बिंबवताना, इतकेच नव्हे तर आपला खरेपणा सिद्ध करायला या आवाजाचीच तर मदत होते. मात्र या आवाजातला सच्चेपणा ऐकणाऱ्याला जाणवयाला हवा. काही अभागी जीव वगळता आवाज ही इतर अवयवाप्रमाणेच आपल्याला मिळालेली देवदुर्लभ देणगी आहे. त्यातून कोकिळेचा कंठ काही भाग्यवंतानाच लाभतो. पण साध्या आवाजातील मार्दवही ऐकणाऱ्याचे लक्ष वेधून घेते.

आवाज पुरुषाचा असो की स्त्रीचा, तो कानाला सुखावणारा, मनाला रिझवणारा असावा. आवाजाच्या अनेक जाती असतात. अनेक पोत असतात. घोगरा, चिरका, बसका, जाडा, पातळ, मंजुळ, मृदू, मुलायम. काही आवाज प्रत्यक्षापेक्षा फोनवरून ऐकायला बरे वाटतात.

फोनवर पलीकडच्या व्यक्तीला समजेल इतके हळू, हलक्या आवाजात बोलणे सर्वानाच जमत नाही. त्यातून फोनवर बोलणाऱ्यापैकी कुणा एकाची श्रवणशक्ती कमजोर असली तर त्यांचं संभाषण किती मनोरंजक होतं हे मी सांगायला नको.

अलीकडे स्त्रीपुरुष समानतेच्या जमान्यातही फक्त चौकोनी कुटुंबातही कित्येक पुरुषांचा 'वुई हॅव नो व्हॉईस अँड चॉईस' हा वरवर थट्टेत वाटणारा, पण आतून दुखावला गेलेला तक्रारीचा सूर ऐकू येतो. बायकांचेही नवरेशाहीबद्दल गाऱ्हाणं असतेच.

एकंदरीत घरोघरी मातीच्या चुली. कुणाच्या ना कुणाच्या आवाजाची गळचेपी घराघरात कधी ना कधी होतच असते. काही घरातल्या वृद्धांनी तर आपला आवाज पूर्ण बंद न करता, आवाजाची धार बोथट करून त्यावर बरचसं नियंत्रण ठेवले आहे. हो- वृद्धाश्रमाची वाट धरण्यापेक्षा आपल्या विचारांना थोडी मुरड घातलेली बरी असं त्यांच्या आतल्या आवाजानी त्यांना सांगितले असावं.

बाहेरच्या आवाजापेक्षा आपला आतला आवाज आपल्या कुठल्याही भावनांचा उद्रेक झाला की चार समजुतीच्या गोष्टी सांगून आपल्याला सांभाळून घेतो.

आतल्या आवाजाजवळ विचार करण्याचा आवाका आहे. निर्णय घेण्याची क्षमता आहे. किंबहुना, आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध झगडण्याचं बळ हा आतला आवाजच आपल्याला देतो. म्हणतात ना- ऐकावं जनाचं, करावं मनाचं. आपल्या द्विधा मनस्थितीत कौल घ्यावा आपल्या अंतर्मनाचा. म्हणजेच आतल्या आवाजाचा.

आता जमाना बदलला. एकविसावं शतक आलं तरी सासूसुनेमधील शत्रूत्वाची भावना तीच आहे. हुंड्यापासून वंशाला वारस हवा म्हणून या प्रत्येक गोष्ट हवीच या हव्यासापायी सुनेचा अनन्वित छळ होण्याचे प्रकार अजूनही काही ठिकाणी होतच असतात.

आता दूरचित्रवाणीवर चालू असलेल्या मालिकांचं प्रक्षेपण पाहिलं तर दिलजमाईऐवजी सासूसुनेच्या नात्यातला संघर्षच प्रकर्षानं दाखवला जातो. तोही एकतर्फी. सून बिचारी घायाळ हरिणीच असते. तिला कुठे मन, भावना असतात- कारण त्या व्यक्त करणारा आवाजच ती हरवून बसलेली असते.

सध्या चालू असलेली 'एक मोहोर अबोल'ही मालिका पहा-

शीर्षकापासूनच नायिकेचा आवाज गायब झाला आहे. तोंडातून ब्र काढणं राहोच, पण वेदनेचा चीत्कार, हुंकार, गळ्यात दाटून आलेला हुंदकाही ती देऊ शकत नाही.

सगळ्या मालिकातून सुनेचा अनन्वित छळ तोही तिचा आवाज सीलबंद करून हे एकच सूत्र वापरलं जातं. असो. त्या मुकाट्यानं सहन करतात ना- मग त्यांच्या दुःखाला वाचा फोडणारे आपण कोण?

या विषयावर चर्चा करून किंवा मोर्चा काढून आवाज उठवण्याइतका आपल्या आवाजाचा पल्ला नाही. तेव्हा बघवलं नाही तर रिमोट घेऊन वाहिनी बदलावी.

या पलीकडेही काही आवाज जे आता ऐकू येईनासे झालेत. गिरण्या बंद पडल्यापासून सकाळी व संध्याकाळी ऐकू येणारे गिरण्यांचे भोंगे, ट्रामच्या घंटीची ट्रिंग ट्रिंग. चिमण्या कमी झाल्यामुळे त्याचा चिवचिवाट.

या मानवनिर्मित आवाजासारखे काही आवाज निसर्गनिर्मित असतात. ढगांचा गडगडाट व विजेच्या कडकडाटासह कोसळणाऱ्या पावसाच्या धारांचा, रिमझिम सरींचा होणारा आवाज, पिंगा घालणाऱ्या वाऱ्यामुळे होणारी पानांची सळसळ, झुळझुळणारा झरा, समुद्रात उठणाऱ्या लाटांचा आवाज, वाऱ्यानं उडणाऱ्या पाचोळ्याचा, तसंच उंच झोका घेताना होणारा झोपाळ्याचा...

याव्यतिरिक्त डासांचं गुणगुणणं, रातकिड्यांचं किरकिरणं, रात्री अपरात्री ऐकू येणारं, शांतता ढवळून टाकणारं बेवारशी कुत्र्यांचं भुंकणं, कानठळ्या बसवणारं संगीत, एखाद्या घरातून वड्याचं तेल वांग्यावर काढताना झालेली बिचाऱ्या भांड्यांची आदळआपट, चाळीतल्या सार्वजनिक नळावरचा कलकलाट. फेरीवाल्यांच्या आरोळ्या...

असे कितीतरी आवाज रोज आपल्या कानावर अक्षरशः येऊन आदळतात. पण त्याला उपाय नाही. जळात राहून माशाशी वैर साधता येत नाही तसंच आवाजाच्या दुनियेत राहून आवाज नको असंही म्हणता येत नाही.

असेच काळजाचा ठोका चुकविणारे दोन आवाज सतत आठवणीत रहाणारे-

१९४४ साली १४ एप्रिलला अवघ्या मुंबापुरीला हादरवून सोडणारा मुंबई बंदरात झालेला प्रचंड स्फोट. त्याचा तो जीवाचा थरकाप उडवणारा आवाज, आणि दुसरा माटुंगा स्टेशनवर गाडी येता येता झालेला प्रचंड बॉम्बस्फोट.

आवाजावर हुकुमत असणं सर्वानाच जमत नाही. पूर्वी बालगंधर्वांनी आपल्या गोड आवाजाने रंगभूमी गाजवली, त्याचप्रमाणे नटवर्य नानासाहेब फाटक, गणपतराव बोडस यासारख्या नटश्रेष्ठांनी आपल्या आवाजातील पल्लेदारपणा व चढउतारानी मराठी रंगभूमी अलंकृत केली.

अलीकडे छोट्या छोट्या गळ्यातून निघालेल्या गोड आवाजाच्या स्पर्धांची पर्वं दूरचित्रवाणीवर चालू आहेत. आपल्या ज्ञातीतील आज काळाच्या पडद्याआड गेलेल्या मोहनतारा अजिंक्य, कमलिनी विजयकर, नीलम प्रभू (पूर्वाश्रमीच्या नीला देसाई) यांच्या आवाजाची ख्याती तर सर्वश्रुत आहे.

आवाज सीमित असावा. तो टीपेला पोहोचला की त्याचा गलका, गोंधळ, गलबला, गदारोळ होतो; जो आपल्या लोकसभा, विधानसभेत नेहमीच होतो.

अशा या ब्रह्मांडात उमटणाऱ्या वेगवेगळ्या नादनिनादात म्हणजेच नादब्रह्म हरवून गेलेल्या माणसाला परमेश्वराशिवाय कोण समजून घेणार? म्हणूनच देव आपल्या काठीचा जराही आवाज होऊ देत नाही. खरंच, एवढ्या आवाजाच्या दुनियेत आवाज नसतो तो फक्त देवाच्या काठीला. पुण्याचं पानशेतचं धरण, गुजरातचा भूकंप, जपानची सुनामी, वर्ल्ड ट्रेड सेंटरचं कोसळणं ह्या आकस्मिक येणाऱ्या आपत्ती हीच असते आवाज न करता तडाखा देणारी 'देवाची काठी'.

*

**परीक्षेतील सुयश**

**मास्टर ऑफ सायन्स प्रोजेक्ट मॅनेजमेंट**

**(बोस्टन विद्यापीठ, अमेरिका)**

सौ. अश्विनी कार्तिक कीर्तिकर

(सौ. स्मिता आणि श्री. प्रकाश कमलाकांत धुरंधर यांची कन्या)

**हसरी रेखा** -प्रदीप कोठारे



# युवामंच

## सलाम चैत्रल

**-पूजा अजिंक्य**

'वलय प्रतिष्ठान' निर्मित 'प्रभु आयडल'च्या सर्व ट्रॉफीज 'किमया क्रिएटर्स'तर्फे आयोजित होतील असे श्री. हर्षल धराधर यांनी सांगितले आणि डिझाइन्स, लोगो इत्यादी बाबींसाठी त्यांच्याकडे जाणं सुरू झालं. हर्षलचा प्रचंड कामाचा व्याप आणि इथं आयडलची जोरदार तयारी यामुळे वेळेचा तुटवडा दोन्हीकडे होता. त्यामुळे फार कमी भेटींमध्ये एवढं मोठं, हवं तसं काम कसं होईल याची आम्हाला चिंता होती. हर्षलला ती चिंता कमी दिसत होती. 'होईल गं, काळजी करू नकोस,' असं तो फोनवरून बोलायचा.

आणि खरोखरच फार कमी वेळेत वीस सन्मानचिन्हे, त्यावरील मानपत्रासह आणि आयडलच्या ५ हिऱ्यांच्या ५ ट्रॉफीज शोच्या दिवशी दिमाखाने थिएटरमध्ये उपस्थित झाल्या आणि हर्षलच्या 'क्रिएटर्स'मधील त्याच्याजवळ असलेल्या हिऱ्याचा आम्हाला 'तपास' लागला, तो म्हणजे 'चैत्रल अशोक धराधर'- हर्षलचे धाकटे बंधु!

या कामादरम्यान जेव्हाही आम्ही हर्षलकडे भेटत असू, हर्षलचं सुपरफास्ट डोकं काही आराखडे तयार करी आणि फक्त 'चैत्रल' अशी हाक मारून काही मिनिटातच सूचना देई. जितक्या संथपणे चैत्रल बाहेर येई, तितक्याच संथपणे तो आत जाई. असंही त्याचं काही ना काही काम चालूच असे. याच दरम्यान काम करताना एकदा चैत्रलची वर्तमानपत्रात छापून आलेली छायाचित्रे त्याच्या आईने आम्हाला कौतुकाने दाखवली. इतका मितभाषी, कोणातही न मिसळणारा चैत्रल वृत्तपत्रात! कारण चैत्रल कोणाशीही गप्पा मारताना मी कधीही पाहिलेला नव्हता. काही विचारलं तर एक हलकीशी स्मितरेषा त्याच्या चेहऱ्यावर उमटते.

असा हा राहणीमानाने, स्वभावाने फार साधा आणि कर्तृत्वाने अचाट चैत्रल आम्हाला गवसला!

पार्ले टिळक शाळेचा हा विद्यार्थी पार्ले कॉलेजच्या आर्टस्‌चा पदवीधर, पण त्याची खरी ओळख वेगळीच आहे. हा चित्रकार, शिल्पकार, व्यंगचित्रकार, व्यक्तिरेखाटनकार असा बराच काही आहे. त्याच्या याच कलांमुळे त्याच्या काकांच्या ओळखीने डॉ. संतोष गायकवाड या पशुवैद्यांशी याचा परिचय झाला.

टॅक्सीडर्मी ही एक कलाच मानली जाते. यात जनावरांच्या मृत शरीरातील अनावश्यक भाग काढून टाकून त्याच्या कातड्याचा वापर करून त्याची प्रतिकृती केली जाते व त्या प्राण्याच्या स्मृती जीवंत ठेवल्या जातात.

डॉ. संतोष गायकवाड हे आजच्या घडीला एकमेव महोदय आहेत, ज्यांना भारतात हे काम करण्याची परवानगी आहे. वन्य प्राण्यांच्या मृतदेहावर प्रक्रिया करून ते जतन करण्याच्या पद्धतीचे ते जाणकार आहेत आणि आज चैत्रल हा त्यांचा मुख्य आर्टिस्ट आहे.

भारतातील कुठल्याही राष्ट्रीय उद्यानात वन्य प्राणी मृत झाल्यास, तसेच तो दुर्मीळ जातीपैकी असल्यास, भारत सरकार त्याचे अस्तित्व जपण्यासाठी गायकवाड यांच्या टीमकडे काम सोपवतात. मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात टॅक्सीडर्मी विभागाकडे मृतदेह जपून पाठवला जातो. तिथे त्याचे कातडे काढले जाते. त्यावर रासायनिक प्रक्रिया केली जाते. जनावरांचे फायबरचे मॉडेल बनवले जाते. विविध वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा वापर करून त्या जनावराचे कातडे अतिशय कौशल्याने त्यावर चढविले जाते आणि त्या मृतदेहावर जीवंतपणीचा दिमाख चढविला जातो.

पाच वर्षांपूर्वी राणीच्या बागेतील 'माया' सिंहिण यांच्या टीमने प्रथम करावयास घेतली होती. डमी बनवायची असली तरी कातडे खरे असते. सुरवातीला कातडे सडण्याचे, फाटण्याचे प्रकार झाले. कातड्यावरील केसही गळले. मॉडेल आणि कातडे यांच्या मापात तफावत आली. अनेक तांत्रिक अडचणी आल्या. पण आता हीच टीम तरबेज झालीए, ज्यात मुख्य वाटा चैत्रलचा आहे असेच म्हणावे लागेल. कारण यावर भारतात बंदी आली होती. प्राणीप्रेमी संघटनेने यावर आवाज उठविला होता. मात्र डॉ. गायकवाड यांनी छंद तसेच दुर्मीळ जनावरांचे संवर्धन या उद्देशाने अतिशय कडक नियमात पुन: जोमाने कार्यास सुरुवात केली.

पूर्वी पेंढा भरून प्राण्याला घरी ठेवले जायचे. ते तंत्र आणि त्याचे उद्देश वेगळे होते. बदलत्या काळात प्रगत तंत्राच्या साहाय्याने वेगळ्या उद्देशाने हे काम होत आहे.

चैत्रल दिवसरात्र कामात गर्क असतो. मुळातच सर्व कामे चैत्रल मनोभावे करतो. 'किमया क्रिएटर्स' मध्ये तो १९९५ पासून काम करतोच आहे. ट्रॉफीज, स्मृतिचिन्हे बनवण्याच्या आपल्या वडील बंधुंच्या व्यवसायात ॲनिमेशन, ग्राफिक्स या नवीन तंत्रज्ञानाच्या पद्धतीचा अवलंब करण्यात तो मास्टर आहे. डिझाईनची कामे तो स्वतंत्रपणे हाताळतो, शिवाय गेल्या ५ वर्षात टॅक्सीडर्मीच्या कलेत त्याने स्वत:ला झोकून दिले आहे.

या पाच वर्षात त्याच्या टीमने १२ फुटी अजगर, पेलिकन पक्षी, एक गिधाड, गोड्या पाण्यातले ६ फुटाचे दुर्मीळ कासव जे सध्या पुण्याच्या म्युझियममध्ये आहे, भारतातील शेवटचा सर्बेरियन वाघ जो नैनितालच्या प्राणीसंग्रहालयात प्रतिकृतीच्या रूपात अद्यापही आहे. या आणि अशा अनेक प्राण्यांना आपल्या कलेने जीवंत ठेवले.

मे २०१२ मधे राजभवनातील 'ट्रॉफी मोर' दगावला. राज्यपाल के. शंकरनारायण यांनी आपल्या प्रिय मोराची स्मृती जपण्याचे ठरवले आणि या टीमने राज्यपालांची इच्छा पूर्ण केली.

सध्या राणीच्या बागेतील हिमालयीन अस्वलावर यांचे काम सुरू आहे.

यांच्या कार्याची दखल टाईम्स ग्रुपच्या वृत्तपत्रांनी, इंडियन एक्स्प्रेस, लोकसत्ता, सामना अशा मोठ्या वृत्तपत्रांनीही घेतली. यांच्या कामाचे कौतुक केले.

चैत्रल हे काम जितकं समरसून करतो तितकंच व्यंगचित्र काढणं! आजपर्यंत अनेक राजकीय नेत्यांची भन्नाट व्यंगचित्रे चैत्रलने काढली आहेत.

पंतप्रधान मनमोहन सिंग आणि सोनिया गांधी यांचे व्यंगचित्र काढल्याबद्दल त्याला जानेवारी २०१० मध्ये बंगलोर येथे भरलेल्या 'इंटरनॅशनल मनमोहन सिंग आणि सोनिया गांधी कॅरिकॅचर प्रदर्शना'त भाग घेण्याचे अगत्याचे निमंत्रण लाभले होते.

२००८ मध्ये बाळासाहेब ठाकरेंचे व्यंगचित्र काढले व स्वत: त्यांना भेट म्हणून दिले. त्या श्रेष्ठ व्यंगचित्रकाराने याची पाठ थोपटली!

'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात' या म्हणीप्रमाणे चैत्रलने लहानपणापासूनच फक्त प्राण्यांवरच प्रेम केलं! प्राण्यांची इतकी अप्रतिम, सूक्ष्म बारकाव्यासहीत चित्र काढायचा की मोठेही अनेकदा अचंबित होत असत. सुट्टीच्या दिवशी हट्टानं आईबाबांना प्राणीसंग्रहालयाला घेऊन जायला सांगायचा. अचाट निरीक्षणशक्ती लाभलेला चैत्रल कलेच्या सेवेपलिकडे कलेकडे बघत नाही. या कामात तो वेळेचे बंधन पाळत नाही. प्रसिद्धीच्या हव्यासात असत नाही. त्याच्या टीमच्या प्रकल्पांमध्ये काढल्या गेलेल्या छायाचित्रांमध्ये तो क्वचितच आढळतो. कसलीही अपेक्षा न बाळगता निरपेक्ष भूतदयाव्रत आचरणाऱ्या चैत्रलला मनापासून सलाम!

*

### Genetic Screening of Pathare Prabhu

India is the second most populous country in the world. According to 2011 census about 1.21 billion people are there in our country. India has more than 2000 ethnic groups and every major religion is represented here. All these groups follow endogamy i.e. they marry within the same group. Therefore, they maintain their own gene pool. Genetic studies of these groups is of great interest as it helps us to establish interrelationships and calculate genetic distances among these groups. Several groups of scientists from our country have screened different population groups from various states for genetic markers. However, vast reservoir of genetic diversity remains unexplored.

It is well known that Pathare Prabhus are among the earliest settlers in Mumbai. Agris, Bhandaris, Kolis and Parsis are some other groups who were staying in Mumbai along with Pathare Prabhus. Kolis and Parsis have been screened to study some genetic markers. However, no work has been done on Pathare Prabhu. So, I intend to screen our community for some blood groups and other genetic markers. This is a first attempt to screen our community.

I will be visiting our community buildings at Thahurdwar, Mahim, Khar etc. alongwith my team to collect some blood samples and some basic information from our community people. The camps may be organized during the gatherings of our community. My appeal to all of you is to extend your cooperation during my visit and help me to complete this important project successfully.

**-Dr. Ajit C. Gorakshakar**
Deputy Director
National Institute of
Immunohematology,
Indian Council Of Medical Research,
13th Floor,- Multistoreyed Complex,
K.E.M Hospital Campus, Parel,
Mumbai – 400 012.

लेखांक ३

# मनातलं

## -सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर

स्वस्छ सुंदर सोनेरी सकाळ, मध्येच येणारी वाऱ्याची आल्हाददायक झुळूक, पक्ष्यांचा किलबिलाट असं सगळं वातावरण असलं नं की माझं मनही उत्फुल्ल होतं. मार्च महिन्यातली सोनेरी सकाळ मला नेहमीच भावते. मनाचं प्रतिबिंब सृष्टीत दिसतं की असं सुंदर वातावरण माझ्या मनाला कवेत घेतं तेच कळत नाही. कोणत्या गोष्टीवर मन कोणती प्रतिक्रिया देईल सांगता येत नाही. हां, पण एक गोष्ट मात्र खरी की समोरची व्यक्ती आपल्याशी बोलत असताना मनात सतत कंस निर्माण होत असतात.

हे मनातले कंस फार बोलके असतात हं! कधी कधी तोंडावाटे ते उघडही होतात, पण पुष्कळदा समोरच्या व्यक्तीवर ते अवलंबून असतं. कधी कधी समोरची व्यक्ती अशी असते की, त्या व्यक्तीचा योग्य तो मान राखण्यासाठी किंवा त्या व्यक्तीचं मन दुखावलं जाऊ नये म्हणून आपण ते कंस मनातच ठेवतो. खरं तर ह्या प्रतिक्रियेमध्ये परिस्थितीचं योग्य व खरं विश्लेषण सामावलेलं असतं. हां... पण ती व्यक्ती आपल्याला मनातून मुळीच आवडत नसली किंवा तिच्याबद्दल मनात राग असेल तर ते कंस फक्त आपल्यापुरतेच खरे ठरतात.

कधी ती व्यक्ती फटकन् बोलणारी असली तर उगीच वाद नको म्हणूनही आपण गप्प बसतो. आपले विचार आपल्या मनातच ठेवतो.

कदाचित् ही उलथापालथ आपल्या संदर्भात लोकांच्या मनातही घडत असेल. हे विचार मनात कुठून शिरतात? कसे शिरतात? कधी कधी समोरची व्यक्ती काही बोलली तर आपण म्हणतो- ''अरे! आता माझ्याही मनात हाच विचार आला.'' काही लोक मानतात की असं झालं तर मिष्टान्नांचा लाभ होतो. त्यावर 'काय अंधश्रद्धाळू आहे!' असा एक कंस आपल्या मनात उमटतोच. ते काहीही असलं तरी विचार मनात येतात कुठून?

ह्याचं उत्तर म्हणजे तत्त्वज्ञानाचा एक सिद्धांत आहे. विचार आपल्या आजुबाजूच्या वातावरणात असतात. आपल्या मनाची ताकद म्हणा किंवा बुद्धीची शक्ती म्हणा, त्यातला एखादा विचार पटकन् उचलते. त्याचवेळी समोरची व्यक्तीसुद्धा तोच विचाराचा धागा पकडते नी पटकन् व्यक्तही करते नी म्हणूनच हा विचार सांगावा की नाही ह्या संभ्रमात पडलेले आपण म्हणतो- 'अरे! माझ्याही मनात हाच विचार आला.'- किंवा दोघांपैकी कुणीही हा विचार व्यक्त करायच्या आधी म्हणजे- 'आत्ता तोच विचार तुझ्या मनात आलाय, जो माझ्या मनात आला आहे?' साध्या भाषेत सागायचं तर एकच विचार दोघांच्या मनात शिरतो किंवा एखाद्याच्याच मनात शिरतो नी ती व्यक्ती म्हणते- 'अरेच्या, मला हे का नाही सुचलं? माझ्या मनात हा विचारच आला नाही.'

मनात? की डोक्यात? कधी कधी आपण म्हणतो नं, की 'माझं एक मन मला हे सांगत होतं नी दुसरं मन तयार होत नव्हतं.'- ही दोन मनं नसतात. त्यामधलंच एक मन म्हणजे बुद्धी असावी. खूपदा आपल्याला उलटसुलट सल्ले मिळतात, तेव्हा खरंच खूप गोंधळायला होतं. आपल्यावरचे लहानपणीचे संस्कार नेहमीच आपलं मन जपत असतं. त्यातूनच 'प्राण जाये पर वचन न जाये'सारखी स्थिती निर्माण होते. आसपासच्या स्थितीनुसार बुद्धी निर्णय घेऊ बघते. तिथं संस्कार फणा काढून उभे राहतात आणि परिस्थितीनुसार वागायचं जेव्हा आपण ठरवतो तेव्हा बुद्धीच जिकत असते. सच्चेपणानं, प्रामाणिकपणानं जगायचं हे संस्कार शिकवतात. तर आता जगच बदलत चाललंय आणि त्यानुसार आपली धोरणं बदलायला हवीत हे चाणाक्ष बुद्धी टिपत राहते. मनावर अंकुश ठेवणारी, निदान ठेवू पाहणारी फक्त बुद्धीच असते. मूळ संस्कारांना पूर्ण तिलांजली देणारी माणसं हेच घोकत राहतात की काळानुरुप आपण बदलायला हवंच.

आपणही संस्कार म्हणून जगाच्या किती मागे राहणार हो? उच्च शिक्षणाचे काही कोर्सेस किंवा तत्सम कॉलेजातील 'ॲडमिशन' मिळवण्यासाठी प्रसंग पडल्यास मॅनेजमेंट सीट मिळवणं हे 'मॅनेज' करायला लागतं. ते केलं नाही तर आपलीच मुलं मागे राहणार. इंटरनॅशनल स्कूल हे त्यापैकीच एक प्रस्थ. तिथली काही लाखांमध्ये भरावी लागणारी फी द्यायला सक्षम पालक सहजगत्या तयार होतात. त्या मुलांसाठी मग व्यक्तिमत्त्व विकासाचे क्लासेस अगदी लहानपणापासूनच सुरू करावे लागतात. आपलं मूल इतरांपेक्षा जास्त स्मार्ट, आता सतत आणि वेगानं बदलणाऱ्या जगात सहज वावरू शकेल असं बनविण्यासाठी पालक प्रयत्नांची पराकाष्ठा करतात. त्यात कुठेही असले तरी लांबच्या एकाद्या अशा गाजलेल्या क्लासमध्ये मुलाचं नाव घालण्यासाठी स्वत: तर धडपडतच, पण नंतर शाळांच्या सुट्ट्यांच्या वेळात घरापासून लांबच्या क्लासमध्ये जाण्याच्या छोट्या मुलांच्या त्रासाकडे चक्क काणाडोळा करतात. आधीच असलेल्या विविध विषयांच्या क्लासमध्ये ह्या क्लासची भर पडते. अभ्यासाच्या विषयांखेरीज आपलं मूल चित्रकलेत, शिवाय मैदानी खेळात तसंच गाण्याच्या किंवा एखादं वाद्य वाजवण्याच्या कलेत प्रवीण व्हावं- नव्हे- त्याला तसं करायचंच ह्या वेडानं पालकही झपाटले जातात.

हा निर्णय बुद्धीचा म्हणावा की मनाचा? खरं तर बुद्धीचा हा निर्णय नाईलाजस्तव मन मान्य करतं नी नंतर त्या विचारांच्या इतकं आधीन होतं की त्या विचारांनीच त्यांच्या मनाला हुरुप येतो आणि मनातल्या त्या निर्णयाबद्दलचा ठाम विश्वास आपलं अधिराज्य स्थापन करतो. तरीही त्या निर्णयाचे परिणाम मनासारखे न मिळता तो निर्णयच मुळात चुकल्याचा अनुभव पुष्कळदा येतो.

मनाचे किंवा बुद्धीचे कोणतेही निर्णय जोपर्यंत समाजकक्षेत येणाऱ्या नियमांच्या नी कायद्यांच्या कक्षेत राहतात, तोपर्यंत सर्व ठीक असतं. पण जेव्हा त्या निर्णयाचे परिणाम कायदा मोडून कायद्याच्या कक्षेबाहेर पडतात तेव्हा मात्र ती मोठी चूक ठरते- मग ती मनाची असो वा बुद्धीची. तेव्हा लोक म्हणतात की, त्या व्यक्तीला खूप हाव सुटली. ही हाव खरं तर फक्त मनाची असते. मिळणाऱ्या अफाट पैशांचा, त्यातून करता येणाऱ्या सुखविलासांचा, ऐषोआरामाचा नी कोणत्याही प्रकारांनी इतरेजनांपासून वेगळ्या स्तरावर राहण्याचा मोह मनाला होतो नी संस्कारातून जन्मलेली सद्सद्विवेक-बुद्धीच गहाण पडते. त्याचा पहिला दृश्य परिणाम हा तुरुंगाच्या वाटेवर नेणारा असतो. पहिल्यापहिल्यांदा त्या व्यक्तीला पश्चात्ताप होतही असावा. ह्या मार्गाकडे जाणारा रस्ता सोपा असतो. परंतु परतीचे दरवाजे त्याच्यामागे बंद होत असतात हे जेव्हा त्याच्या लक्षात येते तेव्हा नाईलाजानं तो हीच वाटचाल चालू ठेवतो आणि नंतर चक्क निर्ढावतो, पूर्णपणे कोडगा बनतो- वेळीच मनावर चांगली बुद्धी दडपण न आणू शकल्यानंच असं होतं.

पण मग त्यातूनच 'मन मारून किती जगणार?' हा खरं तर स्वत:लाही न पटणारा विचार त्याच्या जगण्याचं ब्रीद बनतो. ह्यातलाच एक प्रकार म्हणजे सरकारी कर चुकवण्याचाच नित्य नेमानं प्रयत्न करणे. मार्च महिना म्हणजे खरं तर सगळ्याच क्षेत्रांमधल्या परीक्षेचा नी कसोटीचा काळ. ह्या काळात मनाचं किती ऐकायचं नी बुद्धीचं किती हे त्या त्या क्षेत्रावरून आणि परिणाम आपण कितपत झेलू शकतो ह्यावरूनच ठरवायचं.

मन हे वैश्विक स्तरावर एकाच प्रकारचं. पण स्वभावानुसार प्रत्येकाच्या मनाचं रंगरूप वेगवेगळं. स्वभाव! कसा घडतो हा? मनाच्या व्यापारांना स्वभाव म्हणायचं की बुद्धीच्या व्यापारांना? स्वभाव म्हणजेच वृत्ती? की संस्कार म्हणजे स्वभाव? वृत्ती तसा स्वभाव की स्वभाव तशी वृत्ती?ह्याचं गणित आणि उत्तरही व्यक्तीनुसार बदलणारं... नी म्हणूनच मनातले कंससुद्धा समोरच्या व्यक्तीनुसार बदलणारे.

'मन' ह्या विषयावर बोलू, लिहू तेवढं थोडंच. असा क्वचितच लेखक, कवी अथवा कवयित्री असेल की 'मन' हा विषय लेखनात टाळला असेल. अगदी समर्थ रामदास, बहिणाबाईपासून आत्तापर्यंतच्या सगळ्यांच्या लिखाणात मनावर मनापासून लिहिलं जातं.

हा महिना तसाही बऱ्याच स्थित्यंतराचा. हवामान बदलण्याचा, परीक्षांचं ओझं मनावर घेण्याचा नी ते ओझं जाण्याचा, सरकारी करांतून एक तर ते भरून किंवा चुकवून सुटका मिळविण्याचा, नजीकच्या मे महिन्यात मुलांच्या सुट्यानुसार नी आर्थिक कुवतीनुसार सफरींचं आयोजन नी ऑफीसमधून सुट्टी घेण्याच्या योजनांचा, एक आर्थिक वर्ष संपलं हे लक्षात घेण्याचा नी त्यानुसार पुढच्या आर्थिक योजनांची आखणी करण्याचा, नी वसंत ऋतूची लागलेली चाहूल मनात आत्तापासूनच कुहूकुहूचं गाणं सुरू करणारा...


फॉर्म ४ (नियम ८)नुसार **'प्रभुतरुण'** मासिकाच्या मालकी व अन्य संबंधातील तपशील फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या दिवसानंतर प्रसिद्ध होणाऱ्या अंकात समाविष्ट करावयाचा मजकूर

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अंकाचे नाव | : | प्रभुतरुण |
| २) | मालकी | : | बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण |
| ३) | प्रकाशन काळ | : | मासिक |
| ४) | प्रकाशकाचे नाव | : | प्रा. सुहासिनी कीर्तिकर |
| ५) | प्रकाशन स्थळ | : | पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ |
| ६) | मुद्रकाचे नाव | : | प्रा. सुहासिनी कीर्तिकर |
| ७) | मुद्रण स्थळ | : | मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ |
| ७) | संपादकाचे नाव | : | प्रा. सुहासिनी कीर्तिकर |
| ८) | नागरिकत्व | : | भारतीय |
| ९) | संपादकांचा पत्ता | : | २१, नवी वाडी, दादीशेठ अग्यारी लेन, मुंबई-४००००२ |

मी, सुहासिनी कीर्तिकर याद्वारे असे जाहीर करते की, माझ्या माहितीप्रमाणे वरील तपशील पूर्णपणे खरा आहे.

स्वाक्षरी/-

**सुहासिनी कीर्तिकर,**

प्रकाशक

दिनांक : १६ मार्च, २०१३

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक

## प्रभुतरुणाची डायरी

### नारळसाखर दिला

१३-०२-१३ श्री. राहुल किरण आगासकर
कु. यशाली दिपक नवलकर
२८-०२-१३ श्री. दिनार हेमंत सेंजित
कु. अनुजा आनंद कोठारे

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| २२-०१-१३ | श्रीमती शालिनी खंडेराव कोठारे | वय ९१ | जयपूर |
| २३-०१-१३ | सौ. सुहास (आनंदलक्ष्मी) चिंतामणी (कुमार) वेलकर | वय ८६ | महालक्ष्मी |
| १२-०२-१३ | श्री. चित्रसेन वामनराव व्यवहारकर | वय ८१ | ठाणे |
| १७-०२-१३ | श्री. रवींद्र सुंदरराव अजिंक्य | वय ६९ | अंधेरी |
| ०७-०३-१३ | श्री. शरद बभ्रुवाहन धुरंधर | वय ८८ | खार |

## प्रभुतरुणास देणग्या

❁ श्रीमती कांता केशव तळपदे यांनी २६-०१-१३ रोजी वयाची नव्वद वर्षे पूर्ण केली. नाबाद नव्वद! अभिनंदन! त्याप्रीत्यर्थ त्यांची कन्या सौ. ज्योती पटेल यांजकडून रु.१००१/-

❁ श्री. रवींद्र सुंदरराव अजिंक्य यांच्या स्मृत्यर्थ त्यांच्या कन्या सौ. विजयकर यांजकडून रु. १००१/-

## अभिनंदन

❁ चित्रपटसृष्टीतील जीवनगौरव पुरस्कार वितरण श्री. महेश कोठारे यांच्या हस्ते झाले. अभिनंदन.

❁ देवनार येथे झालेल्या बालसाहित्य जल्लोषात डॉ. सुमन नवलकर यांनी कथाकथन आणि कवितावाचन केले. त्याची नोंद 'महानगर' वृत्तपत्राने घेतली. अभिनंदन.

❁ 'चेरीलँड' या बालमासिकात डॉ. सुमन नवलकर आणि प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांच्या बालकथा प्रसिद्ध झाल्या.

❁ ठाणे मराठी ग्रंथसंग्रहालयातर्फे साजऱ्या झालेल्या 'महिला दिना'त दि. ८ मार्च रोजी 'ज्ञानेश्वरी एक संजीवनी- आजच्या महिलांसाठी' या विषयावर आधारित संवादात प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांनी विचार मांडले.

## पाठारे प्रभु चॅरिटीज

दिनांक १० फेब्रुवारी २०१३ रोजी सुरेश विठ्ठल सभागृहात चॅरिटीजतर्फे वैद्यकीय चिकीत्सा शिबीर घेतले गेले. डॉ. गजानन वि. विजयकर आणि डॉ. प्रदीप ग. विजयकर यांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले. यावर्षी या शिबीराचा लाभ घेणारे ८४ सदस्य होते. डॉ. गजानन विजयकर, डॉ. प्रदीप विजयकर, डॉ. अरुण जयकर,डॉ. सुनील द. आगासकर, डॉ. विद्याधर सु. आगासकर, डॉ. तन्मय प्र. विजयकर, डॉ. वैशाली अजिंक्य, डॉ. श्वेताली प्र. विजयकर, डॉ. मीताली प्र. विजयकर, डॉ. अमीत धुरंधर, डॉ. हर्षद ना. विजयकर, डॉ. अपूर्वा ह. विजयकर, डॉ. रजनी कोठारे ह्या ज्ञातीय डॉक्टरांचे आणि डॉ. फुलेंद्र कोठारी यांचे सहकार्य लाभले.

## पाठारे प्रभु महिला समाज

रविवार दिनांक २४ फेब्रुवारी २०१३ रोजी पाठारे प्रभु महिला समाजाचा ९८वा वार्षिक बक्षिस समारंभ खारच्या पाठारे प्रभु को ऑप. सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात ॲड. सौ. निलीमा श्रीकांत कानेटकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

समाजाध्यक्षा सौ. वृंदा जयकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले व पाहुण्यांचा परिचय करून त्यांना भेटवस्तू देवून स्वागत केले.

समाजाच्या उपाध्यक्षा सौ. स्वाती जयकर यांनी रौप्यपदक मानकऱ्यांचा परिचय करून दिला. ती पदके अशी-
समाजसेवा रौप्य पदकः- श्रीमती स्निग्धा उल्हास कोठारे
विविधांगी नैपुण्य रौप्य पदकः- डॉ. सौ. मेधा संजीव धुरंधर
गृहकृत्यदक्ष रौप्य पदकः- सौ. आशा जयबाळ विजयकर
सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनी रौप्य पदकः- डॉ. सौ. रश्मी यतीन व्यवहारकर
परीक्षेतील उज्ज्वल यशाप्रीत्यर्थ रौप्यपदकः- कु. कृतिका सुधांशु व्यवहारकर.

वेगवेगळ्या क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या भगिनीला रौप्यपदकः सौ. दिपश्री सुदीप कोठारे

समाजाने काही भगिनींचा विशेष कार्य केल्याबद्दल गौरव केला. त्यांचा परिचय चिटणीस सौ. अक्षदा तळपदे यांनी करून दिला. श्रीमती वंदना प्रमोद नवलकर, सौ. मनिला अनिल राव, सौ. लीना यतीन विजयकर, सौ. आरती आल्हाद गोरक्षकर, सौ. पूजा अमर अजिंक्य, सौ. रॉनिका सचिन विजयकर, कु. वैजयंती विश्वास अजिंक्य, कु. सिमरन मनीष धैर्यवान व कु. श्रद्धा दिपक धराधर या सर्व भगिनींना पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

विविध शैक्षणिक क्षेत्रात व स्पर्धांमध्ये यशस्वी झालेल्या भगिनींना समारंभाध्यक्षांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले.

समारंभाची गीते श्रीमती नलिनी रामराव तळपदे यांनी लिहिली. या गीतांना श्री. अशोक सुर्वे यांनी स्वरबद्ध केले. संवादिनीवर श्रीमती मेघन आंगणे यांनी साथ केली. तबल्यावर साथ श्री. अमेय राजाध्यक्ष यांची होती. सौ. करिष्मा स्वप्नील कीर्तिकर यांनी आपल्या सुमधूर आवाजात ही गाणी गायली.

सौ. विभा रणजित यांचा खाद्यपदार्थाचा स्टॉल ठेवण्यात आला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व देणग्यावाचन सौ. नीता सेंजित यांनी केले.

आभार प्रदर्शन चिटणीस सौ. नूतन कीर्तिकर यांनी केले. शेवटी राष्ट्रगीताने या समारंभाची सांगता झाली. समाजातर्फे उपस्थितांना कुल्फी देण्यात आली.

❁ रविवार दिनांक १० फेब्रुवारी २०१३ रोजी पाठारे प्रभु महिला समाजाची एक दिवसीय सहल ग्रीन हिल रिसॉर्ट, नालासोपारा येथे नेण्यात आली.

**MAHABALESHWAR**

***COME HERE TO EXPERIENCE NATURE AT ITS BEST WITH***
***JASMINE COTTAGE***




*THE COTTAGE OFFERS 4 SPACIOUS ROOMS .*
*IT PROVIDES ACCOMODATION FACILITIES TO SUIT THE BUDGET OF THE TOURIST*
*ALL THE ROOMS HAVE SERENE ENVIRONMENT AND OPEN SIT-OUT VARANDA WHERE GUESTS CAN SIT AND ENJOY THE PLEASANT BEAUTY OF THE NATURE*

**FACILITIES:**
* Attached bath
* Hot & Cold Running water
* Television with Satellite Connection
* Car Parking
* Large open area for playing outdoor games

**Location:**
It is located near the market in Mahabaleshwar within close proximity of bus stand in the gorgeous land of Mahabaleshwar.

***For Booking Contact:***
***Velkars 9930172689 9220451465***

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

**संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर** RNI NO. 14613/67